"Empowerment of Girl's students in pursuit of Knowledge, Values & Self-reliance"

शिक्षण मंडळ, कराड संचालित

# महिला महाविद्यालय, कराड

(कला, वाणिज्य व विज्ञान)


फा. प्लॉट नं. २२२, मंगळवार पेठ, कराड, जि. सातारा (महाराष्ट्र) फोन नं. ०२१६४-२२०८४१

वेबसाईट: www.mahilamahavidyalaya.com

ई-मेल: karadmahila@gmail.com




महिला महाविद्यालय, कराड.

शिक्षण मंडळ, कऱ्हाड.






# संवादिनी

वार्षिक नियतकालिक

सन २०२४ - २५





# महिला महाविद्यालय, कराड
## लोकमान्य ग्रीन क्लब
## * अहवाल *

प्रा. विनोद सागरे
समन्वयक,
लोकमान्य ग्रीन क्लब,
महिला महाविद्यालय, कराड

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने महिला महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये लोकमान्य ग्रीन क्लब ची स्थापना करण्यात आली. नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण व पानी बचत अभियानाची अंमलबजावणी विद्यार्थिनींच्या मार्फत शैक्षणिकवर्ष २०२३-२४मध्ये व्यापक स्वरुपात करण्यात आली. या वर्षामध्ये WHY WASTE, MYCA EXAM. व २२ मार्च जागतिक जलदिनानिमित्त विविध उपक्रम घेण्यात आले. यांचे गगनभेदी यश म्हणजे 'जिल्हास्तरीय तृतीय' पुरस्कार लोकमान्य ग्रीन क्लबला प्राप्त झाला.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ग्रीनच्या वतीने अनेक उपक्रम घेण्यात आले. यामध्ये सर्वात महत्वाचा उपक्रम म्हणजे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अग्रणी महाविद्यालय उपक्रम योजनेतंर्गत Research Sensitization Scheme for the college student, Research Promotion Activity for Student of affiliated college /institutions under college scheme "कराड तालुक्यातील लोकांच्या दैनंदिन पाणी वापराचा अभ्यास" संशोधन प्रकल्प सादर करण्यात आला. त्याचबरोबर एकदिवसीय कोकेडामा कार्यशाळा घेण्यात आली. दि.०६/०२/२०२५ रोजी NAAC Peer Team साठी छानसे आकर्षक पर्यावरणपूरक असे कोकेडामा तयार करण्यात आले. २२ मार्च जागतिक जलदिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.

************

# तुझी शतकपूर्ती

* तुझी शतकपूर्ती साजरी होताना
डोळे माझे दिपून गेले
‘शिक्षण मंडळा’ डोळे माझे दिसून गेले,
साता समुद्रापार तुझ्या कीर्तीचा डंका
एकून उर माझे भरून आले
‘शिक्षण मंडळा’ उर माझे भरून आले

* १९२० ची तुझी ती स्थापना
जणु ती ज्ञानाची क्रांती
साक्ष देई आज तुझा वारसा लोकमान्यांचा
कणाकणात दिसे अन नसानसात वाही
नारा तुझ्या राष्ट्रभक्तीचा
नारा तुझ्या राष्ट्रभक्तीचा ....

* १९२० च्या राष्ट्रपुरुषाची तुझी ती महाशोकसभा
पूर वाही अश्रूंचा, काठ भरे जणु कृष्णेचा
निधन वार्ता पडताच कानी दु:ख फिरे चारी दिशा
वाहिलेल्या अश्रूमधून ठिणगी पडली ज्ञानाची
असेल अशी ही पहिली क्रांती, या भूतलावर
दु:खाच्या महासागरात होई, ज्ञान यज्ञाचा ठराव !
ज्ञान यज्ञाचा ठराव !

* तुझा कणखर आवाज नी स्पष्ट बाणा, दिल्लीत घुमला
तुझ्याच त्या कणखर बाणाच्या संस्कारावर
घडविला यशवंताने उभा हा महाराष्ट्र
सदैव इतिहास साक्ष देई महाराष्ट्राचा पहिला मुख्यमंत्री
कराडच्या शिक्षण मंडळाचा विद्यार्थी
जणु आभाळाच्या उंचीचा, जणु आभाळाच्या उंचीचा!

* शिक्षण मंडळा तुझा महिमा किती अपार
घडविले यशवंतास किती महान |

* साता समुद्रापार फिनलंड हेलसिंकीच्या धरतीवर
डंका तुझा खाशाबा जाधव यांनी वाजविला
आकाशाला गवसणी घालणारे ते कास्यपदक
जणु लाभले ते रत्न शिक्षण मंडळाला
किर्ती तुझी थोर नी महिमा तुझा अपरंपार
नशीब तुझे मोठे, आणि भविष्य तुझे तेजोमय
भविष्य तुझे तेजोमय
शिक्षण मंडळ भविष्य तुझे तेजोमय

**************

# *जागतिक अर्थव्यवस्थेचे भारताचे वाढते स्थान*

सायली रविंद्र बुरुंगे
मयुरी मनोज भोई

आजच्या घडीला भारत जगातील सर्वात वेगाने प्रगती करणाऱ्या अर्थव्यवस्थेपैकी आहे. स्वातंत्र्यानंतर अनेक आर्थिक आव्हानांचा सामना करताना भारताने सातत्याने विकास साधला आणि आज तो जागतिक अर्थ व्यवस्थेत एक प्रभावी शक्ती म्हणून कार्य करतो. गेल्या काही दशकात भारताने 'तंत्रज्ञान, उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्र आणि मानवी संसाधनांच्या बळावर स्वतः चे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

नाममात्र (Nominal) जीडीपीनुसार भारत सध्या जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. आणि क्रयशक्ती समानतेनुसार (PPP) तिसऱ्या क्रमांकावर आहे. जागतिक स्तरावर आर्थिक धोरणे आणि विकासावर प्रभाव टाकण्यासाठी भारताचे महत्त्व वाढत आहे. ज्याचे श्रेय त्याच्या बाजारपेठेला वाढत्या सेवाक्षेत्राला आणि सरकारी धोरणांना दिले जाते. भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थ व्यवस्थापैकी एक आहे. ज्याचा GDP अंदाजे ४ ट्रीलीयन डॉलरच्या पुढे गेला आहे. वाढत्या GDP उत्पादन आणि खाजगी उपभोग यामुळे भारताची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होत आहे.

* भारताचे जागतिक अर्थव्यवस्थेतील स्थान :-

१) चौथी मोठी अर्थव्यवस्था :-

नाममात्र जीडीपीनुसार (Normal GDP) भारत सध्या अमेरिका, चीन आणि जर्मनीनंतर जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे.

२) तिसरे स्थान (PPP) नुसार :-

क्रयशक्ती समानतेच्या (Purchasing Power

३) वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था :-

जगातील सर्वात वेगाने वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थामध्ये भारताचा क्रमांक चीन पाठोपाठ दुसरा आहे.


४) जागतिक भांडवलाचे केद्र :-

भारत जागतिक भांडवलासाठी एक प्रमुख गतव्यस्थान म्हणूनही विकसित होत आहे.

| | |
|---|---|
| GDP वाढ दर | आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारताच्या GDP वाढ दर ६.५% होता. ही वाढ जागतिक अनेक देशांच्या तुलनेत खूपच जास्त आहे. |
| तिमाही वाढ | २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीत (एप्रिल-जून) वाढ ७.८% पर्यंत पोहोचली. हे एक महत्त्वाचे चिन्ह आहे की वाढीचा झपाट्याने वेग दरही वाढत आहे. |
| वैश्विक वाढीसाठी योगदान | मागील दशकात जागतिक GDP वाढीत भारताचा १६% आहे. |
| जागतिक GDP मधील हिस्सा (पीपीपी मध्ये) | २००० मध्ये भारताचा हिस्सा सुमारे ४% होता. २०२३ मध्ये हा सुमारे ७.५% झाला. पुढील काही वर्षात हा हिस्सा १०% पर्यंत जाऊ शकेल असा अंदाज आहे. |
| निव्वळ जागतिक Economy च्या राजधानीत सुधारणा | EY या संस्थेने अंदाज दिलाय की खरेखुरे GDP व PPP दर जर कायम राहिले तर भारत २०३८ पर्यंत जगातील दुसऱ्या स्थानावर येऊ शकतो. |


आपण चीन, भारत, ब्राझील या तीन देशाचा GDP वाढीचा दर आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट केला आहे.






Nominal GDP Rate

यावरून असे दिसून येते की Nominal GDP Rate मध्ये चीन खूप मोठा आहे तो पहिल्या क्रमांकावर आणि भारत दुसऱ्या क्रमांकावर व ब्राझील त्यापेक्षा लहान आहे. भारत व ब्राझील यांना यामध्ये वाढ करणे गरजेचे आहे.




GDP Grouth Rate (%)

GDP Grouth Rate मध्ये भारत सर्वाधिक वाढ दाखवत आहे. त्याच्यानंतर चीन व ब्राझील आहेत.

*********

# * महिला सक्षमीकरण *

**मलेका जमाल सुतार**
**बी.कॉम.भाग III**

**प्रस्तावना :-**

महिला सबलीकरण म्हणजे महिलांना सर्व क्षेत्रांमध्ये समान हक्क व संधी मिळवून देणे आणि त्यांना स्वत:च्या आयुष्याचे निर्णय घेण्यास सक्षम बनवणे होय. आजचा काळ विज्ञान,शिक्षण आणि तंत्रज्ञानाचा असला तरीही अनेक महिलांना अजूनही सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक अडथळ्यांना सामोरे जावे लागते.

पूर्वीच्या काळात महिलांना घरापुरतेच मर्यादित ठेवले गेले. त्यांना शिक्षण, नोकरी, स्वतंत्र मत या गोष्टींपासून वंचित ठेवण्यात आले. पण आता काळ बदलत आहे. महिलांना त्यांचे मुलभूत हक्क, शिक्षण, आयोग्य, सुरक्षितता, आर्थिक संधी आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळाली पाहिजे.

**प्रकार:-**

१) शैक्षणिक सशक्तीकरण :-

शिक्षण ही प्रगतीची पहिली पायरी आहे. शिक्षणामुळे स्त्री आत्मविश्वासाने जगते. तिचे विचार विस्तृत होतात आणि ती स्वत: चा आणि समाजाचा विकास करू शकते.

२) आर्थिक सशक्तीकरण :- जेव्हा महिला कमाऊ लागतात, तेव्हा त्यांचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य वाढते. उद्योग, नोकरी, व्यवसाय यामध्ये महिलांचा सहभाग वाढवणे गरजेचे आहे.

३) राजकीय सशक्तीकरण :- महिलांनी राजकारणात सहभागी होणे म्हणजे समाजाच्या निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढवणे. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना ३३% आरक्षण देण्यात आले आहे.

४) सामाजिक सशक्तीकरण:- स्त्रियांवर लादलेल्या रूढी, परंपरा, भेदभाव मोडून समाजात त्यांना सन्मान मिळवून देणे.

**महत्त्व:-**

१) महिलांना समाजात समान व प्रतिष्ठेत स्थान मिळते.

२) महिलांना आत्मनिर्भर बनवतात व स्वत:चे निर्णय घेऊ शकतात.

३) कौटुंबिक व सामाजिक विकासात महिलांचे मोठे योगदान असते.

४) लैगिक अन्याय, छळ, हिंसा या विरुद्ध महिला उभी राहू शकतात.

५) देशाच्या आर्थिक सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात महिला मोलाचे योगदान देऊ शकतात.

**उपाय :-**

१) शिक्षणाचा प्रसार :- प्रत्येक मुलीला मोफत व दर्जेदार शिक्षण मिळालेच पाहिजे.

२) सरकारी योजनांचा प्रभावी अंमलबजावणी- जसे की उज्ज्वला योजना, सुकन्या समृद्धी योजना, महिला बचत गट इ.

३) स्वयंरोजगार व उद्योजकतेला प्रोत्साहन – महिलांसाठी प्रशिक्षण, कर्ज, स्टार्टअप योजनेचा लाभ.

४) कायदेशीर साक्षरता शिबीर – महिलांना त्यांच्या हक्कांबाबत माहिती देणे.

५) स्त्रीसुरक्षा व आत्मसरंक्षण प्रक्रिया- शारिरीक व मानसिक सुरक्षा वाढवण्यासाठी प्रशिक्षण.

**फायदे:-**

महिला सबलीकरणाचे काही महत्त्वाचे फायदे:-

१) महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो.

२) समाजात लिंग समानता निर्माण होतो.

३) महिला शिक्षित व आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवतात.

४) कुटुंबाचा व समाजाचा विकास होतो.

५) देशाच्या एकूण विकासात महिलांचे योगदान वाढते.

६) हिंसा, छळ, अन्याय या विरुद्ध महिलांमध्ये लढण्याची ताकद येते.

**तोटे :-**

१) परंपरागत विचारसरणी – अजूनही अनेक ठिकाणी महिलांना दुय्यम स्थान दिले जाते.

२) शिक्षणाची कमतरता :- विशेषत: ग्रामीण भागात

३) पुरुषप्रधान मानसिकता :- महिलांच्या यशाला सहन न होणे.

४) काही ठिकाणी सशक्तीकरणाचा अवापर- चुकीच्या गोष्टीसाठी स्वातंत्र्याचा गैरवापर

५) योजनाचा लाभ सर्व महिलापर्यंत न पोहोचवणे.

******************




---

# *अनुभव *

अनुभव म्हणजे जीवनाची शिदोरी,
क्षणोक्षणी देत राहावे नवीच पखोरी |

गोड-तिखट चवींची असते ही वाट,
कधी आनंद, कधी दु:ख कधी सुख |

चुका शिकवतात योग्य दिशा,
आधार दाखवतो प्रकाशाची भाषा |

पडलो तरी उभ राहायला शिकवतो,
हरलो तरी जिंकण्याची उमेद देतो |

जगण्याच्या वाटेवर संकट येते,
अनुभवच माणसाला हात धरून देतो|

अनुभवांनीच माणूस घडतो,
जीवनाचा खरा अर्थ कळतो |

*****

# सध्याच्या शिक्षण पद्धतीत AI (आर्टिफिशल इंटेलिजन्स) चा वापर

बामणे धनश्री संतोष
बी.ए.भाग -३

आर्टिफिशल इंटेलिजन्स सर्वच क्षेत्राबरोबर शैक्षणिक विशेषता प्राथमिक व माध्यमिक स्तरावर खूपच क्रांती घडवून आणत आहे. AI विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत शिक्षण अनुभव, शिक्षकांसाठी सहाय्यक आणि प्रशासकीय कार्यात सहजता आणण्यासाठी मदत करू शकते. AI शैक्षणिक कार्यासाठी खालील प्रकारे उपयोगिता आणू शकते.

१) वैयक्तिक शिक्षण अनुभव:-

AI विद्यार्थ्यांच्या शिक्षण पद्धती, गती आणि कुवत बाजू डेटा विश्लेषणाद्वारे ओळखतो. तो उदाहरणार्थ जर एखादा विद्यार्थी गणितात कमकुवत असेल तर AI त्याला अतिरिक्त सराव आणि व्हिडिओ सामुग्री सुचवते.

* Dream Box:- हे साधन गणिताच्या समस्यांना गेम्स आणि इंटअ‍ॅक्टिव्ह क्रियाकल्पामध्ये रूपांतरित करते.

२) स्वयंचलित ग्रेडिंग आणि अभिप्राय:-

AI बहुपर्यायी प्रश्नांपासून हस्तलिखित उत्तरापर्यंत ग्रेड करू शकतो. त्यामुळे शिक्षकांच्या कामाचा फार 50 टक्के पर्यंत कमी होतो.

* ग्रेडस्कोप Gradescop :-

हे साधन हाताने लिहिलेली उत्तरे स्कॅन करून शिक्षकांनी तयार केलेल्या उत्तरानुसार तपासते. हे समान चुका गटबद्ध करून शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या अडचणी समजण्यास मदत करते.

* Turntin :- हे साधन विद्यार्थ्यांची असाइनमेंट डेटाबेसशी तुलना करून साहित्यिक चोरी ओळखते.

३) इंटेलिजंट ट्युटरिंग सिस्टीम :-

ही सिस्टीम विद्यार्थ्यांना मानुनी ट्युटरसारखा आधार देतात. हे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना त्वरित उत्तर देते आणि चरण दर समाधान शिकवते.

*** Carnegie Learning (MATHLA) :-**

हे AI साधन गणिताच्या समस्या सोडवताना वास्तविक वेळात अभिप्राय देते. जर विद्यार्थी चुकत असेल तर ते त्याला ताबडतोब योग्य दिशेने नेते.

*** Squirrel AI:-** हे साधन विद्यार्थ्यांच्या कामगिरीवर आधारित शिक्षणातील तफावत ओळखते आणि ती भरून काढण्यासाठी अनुकूल सामग्री पुरवित.

**४) व्हर्चुंअल असिस्टंट आणि चॅट बॉटस:-**

हे चॅट बॉटस विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी, गृहपाठात मदत करण्यासाठी किंवा संकल्पना समजावण्यासाठी 24 तास उपलब्ध असतात.

* IBM Watson Assistant :- हे शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी व्हर्चुंअल हेल्पडेस्कसारखे काम करते उदा. विज्ञान प्रकल्पासाठी कल्पना सुचवते.

* Replika :- हे इंग्रजी किंवा इतर भाषांचा सराव करण्यासाठी उपयुक्त आहे, जिथे विद्यार्थी चॅट कौशल्य सुधारू शकतात.

**५) भाषा शिक्षणासाठी सहाय्य:-**

AI भाषा शिक्षणाला इंटरॲक्टिव्ह बनवते. उच्चार, व्याकरण आणि व्याक्यरचना सुधारण्यात मदत करते.

* Dulirgo :- यातील AI बड्‌र्स (हिरवा घुबड) विद्यार्थ्यांच्या कामगिरीनुसार अडचणींची पातळी समायोजित करतात. चुका ट्रॅक करून त्यावर लक्ष केंद्रित करते

* Rosetta Stone:- याचे स्वीच रेकग्निशन साधन विद्यार्थ्यांच्या उच्चारांचे विश्लेषण करून त्यावर अभिप्राय देते.

६) शैक्षणिक सामग्री निर्मिती :-

शिक्षकांना पाठ योजना, प्रश्नपत्रिका आणि प्रेझेंटेशन तयार करण्यास मदत करते. वेळ वाचविण्यासोबत रोचक बनवते.

* Canva Magic Write:- हे AI साधन शिक्षकांना विषयानुसार सर्जनशील कल्पना आणि मसुदे तयार करण्यास मदत करते. वेळ वाचवण्यासोबत रोजच्या बनवते.

* Quilionz :- हे साधन कोणत्याही मजकुराच्या आधारे Fill in the blanks आणि लघुप्रश्न तयार करते.

७) विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी समर्थन:-

AI साधने डिस्लेक्झिया, ऑटिझम किंवा श्रवणदोष नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षण सुलभ करतात.

* Google Read Along :- हे साधन मुलाने मोठ्याने वाचन करताना त्याच्या आवाजाचे विश्लेषण करून चुका दुरुस्त करते. डिस्लेक्झिया असलेल्या मुलांसाठी उपयुक्त .

* Microsoft Finnersive Reader :-

हे साधन मजकुराला ऑडिओमध्ये रूपांतरित करते फॉन्ट आकार समायोजित करते आणि शब्द हायलाईट करून वाचन सोपे करते.

८) प्रशासकीय कामामध्ये सुलभता :-

AI साधन शाळांमधील उपस्थिती, वेळापत्रक आणि संसाधन वाटपासाठी कामे स्वयंचलित करते.

* Classcraft :- हे गेमीफाईड प्लॅटफॉर्म वर्गातील वर्तन ट्रॅक करते. विद्यार्थिनीच्या सहकार्याचे आणि प्रेरणेचे विश्लेषण शिक्षकांच्या कडून होते.

* Face Recognition APD :- AI आधारित चेहरा ओळख प्रणाली उपस्थिती स्वयंचलितपणे नोंदवते. ज्यामुळे रोल कॉलचा वेळ वाचतो.

९) डेटा विश्लेषणाद्वारे प्रगती ट्रेकिंग :-

AI विद्यार्थ्यांची कामगिरी, उपस्थिती आणि सामाजिक भावनिक विकास डेटा गोळा करून तपशिलवार अहवाल तयार करते.

* Power School :- हे प्लॅटफॉर्म शिक्षकांना वास्तविक वेळेत ग्रेड्स असाईनमेंटस आणि चाचणी स्कोअरचे विश्लेषण करून देते. त्याची AI पुनानुमानीत विश्लेषणे अतिरिक्त मदतीची गरज असलेल्या विद्यार्थ्यांना ओळखतात.

१०) शिक्षक प्रशिक्षण :- AI शिक्षकांच्या शिकण्याच्या शैलीचे विश्लेषण करून त्यांना अभिप्राय देते. नवीन शिक्षकांना वर्ग व्यवस्थापन आणि पाठयोजना सुधारण्यात मदत करते.

* Ethana:- हे प्लॅटफॉर्म शिक्षकांना त्यांच्या शिकवण्याच्या सत्रांचा व्हिडीओअपलोड करण्यास आणि AI जनरेटेड अभिप्राय मिळवण्यास सक्षम करणे. उदा. वर्गात विद्यार्थ्यांनी किती वेळ लक्ष दिले हे दाखवते.

विद्यार्थ्यांची गोपनीयता आणि डेटा सुरक्षा लक्षात घेऊन हे सर्व केले जाते. तसेच AIला शिक्षकाचा पर्याय नव्हे तर एक सहाय्यक साधन समजावे.

********



# * साया *

सिमरन इम्रान बागवान
B.A.II अर्थशास्त्र

ये बात आज तक मैने किसी को नही बतायी की ओ काला साया मुझे दिखाई देता है| मैने यह बात अपनी मा को भी नही बताई | ओ साया मुझे हमेशा अपने आसपास दिखाई देता है| शायद वह मुझे देख सकता है| या फिर वह सिर्फ मुझे देखता है| मै जहा भी जाऊ वह मेरा पीछा करता रहता है| मै स्कूल जाऊ तब भी, जब मैं गार्डन मे खेलती हुँ तब भी| वो मुझे मेरे कमरे की खिडकी से देखता है| जब मै अपने कमरेमे सोती हुँ तब भी वह मुझे घुरता रहता है| वो मुझे कोई नुकसान नही पहुँचाता बस मुझे देखता रहता है | उसे से मुझे एक अजीब सी बदबू आती है, बहुत ही अजीब सी|

मुझे आज भी याद है| जब मैंने उसे पहली बार देखा था| हम ने किराये पर घर लिया था| घर बहुत बडा था| उसमे कमरे भी जादा थे| इस वजह से ही मुझे और मेरी बहन को अलग अलग कमरे मिले थे| जब मै सीडिया चढकर अपने कमरे की ओर जा रही थी, तब मुझे अजिब सी बेचैनी महसूस हो रही थी| जैसे ही मैने अपनी कमरे का दरवाजा खोला मै कुछ देर के लिए साँस नही ले पायी| मेरा शरीर पत्थर की तरह सक्त बर्फ की तरह थंडा हो चुका था, क्यूंकि मुझे मेरे सामने ओ था वही काला साया जो अब मेरे पंखे से लटक रहा था, उसका मुँह मेरी ओर ही था, वो अपने बिल्ली जैसी आँखे से मुझे डरावनी तरह देख रहा था| उसके बाद मै बेहोश हो गई| जब मेरी आँखे खुली, तब मै अस्पताल के कमरे मे थी| मेरी माँ मेरे पास बैठी थी| मुझे एक कुछ कह रही थी पर मुझे कुछ सुनाई नही दे रहा था| जब मैने अपनी आँखे कमरे में घुमाई तो कोने में वह खडा मुझे घुर रहा था| वही काला साया...

**************

# * युवा *

सानिया निजाम मुल्ला
बी.ए. भाग III

युवा नाम मे ही उत्साह, आनंद, उमंग है| सच में युवा होना कितना आनंद देता है | और केवल आयु या उम्र से नही बल्की मन से युवा होना जरुरी है|

जग में जितनी भी क्रांतीयाँ हुई है, या नही खोज हुई है, या नही खोज हुई है उसके पीछे उस जमाने के युवकोंकी मेहनत है| जैसे हमारे देश का ही विचार किया जाए तो प्राचीन काल से आधुनिक युग तक भगवान श्रीकृष्ण से लेकर सर्वपल्ली राधाकृष्णन ए.पी.जे. अब्दुल कलाम तक सब युवा ही थे| महात्मा गांधी, भगतसिंग, टिळक, आगरकर, ना. गोखले, सुभाषचंद्र बोस, स्वामी विवेकानंद से लेकर शाहू फुले आंबेडकर तक यह सूची बढती ही जायेगी| कोई समाजसुधारक, कोई वैज्ञानिक तो कोई स्वातंत्रता सेनानी या अध्यात्मक गुरु आदि | विश्व मे युवाओं की संख्या सबसे ज्यादा भारत देश मे है | लेकिन इनमें से कई सारे युवक बुरी आदते जैसे शराब, जुआ, अंतरजाल का जादा उपयोग दिन रात मोबाईल पर चॅटिंग करना परिवार से दूर भागना, अपने मस्ती में रहना, इन आदतोंसे घिरे हुए है| उन्हे इस बात पर सोचना चाहिये विचार करना चाहिए|

देश में बहुत सारी ऐसी संस्थाएँ है, जो समाज के लिये, गरीब या असहाय्य लोगों के लिए कार्य करती है| ही संस्थाओं मे युवाओं की जरूरत होती है| निस्वार्थ भावना से कार्य करने वाले लोगों की आवश्यकता होती है, तो ऐसी संस्थाओं मे युवाओं ने काम करना चाहिए| हमारे राज्य मे ऐसी बहुत सारी संस्थाएँ है जैसे आनंदवन हेमलकसा की लोक बिरादरी संस्था, अभय बंग जी की सर्च संस्था आदि| युवा इन संस्थाओं मे कार्य करेंगे तो वो देश की सेवा ही करणे जैसा है|

बिता हुआ समय तो गया लेकिन आनेवाले समय का सही उपयोग सही कार्य करने के लिए अगर युवक करेंगे तो उसका फायदा खुद को, आजूबाजू के समाज को पूरे देश को और अंतिमतः सारे विश्वको हो सकता है | और यह करने की ताकत इन युवाओं मे जरूर है क्योंकि युवा मतलब, उत्साह, आनंद, उमंग चैतन्य |

***************

# * भारतातील औद्योगिक विकास *

जाधव स्नेहल अधिकराव
बी.कॉम. IT- I

प्रस्तावना :-

अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत भारतात अनेक उद्योगधंदे व कसवे कारागिरांचे व्यवसाय भरभराटीस आले होते. अनेक जागतिक बाजारात भारतीय वस्तूंना विशेषत: सुती व रेशमी कापड, शाली, जरी काम व कोरीव काम यांना मागणी होती. परंतू इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीमुळे भारतीय उद्योग धंद्यावर विपरीत परिणाम होऊन अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत जवळपास गेले.

१) ब्रिटीश विघातक व्यापारी व आर्थिक नीती.

२) आंतरदेशीय राज्यांच्या ऱ्हासाबरोबर उद्योगधंद्यावर असणाऱ्या राजाश्रयाचा लोप.

३) औद्योगिक क्रांतीमुळे मोठ्या प्रमाणावर व त्यामुळे स्वस्थ यंत्र उत्पादित वस्तूंच्या स्पर्धेत आंतरदेशीय व परदेशीय बाजारपेठात भारतीय मालाचा ऱ्हास.

४) परदेशीय पक्क्या मालाच्या आयातीस व आंतरदेशीय मालाच्या निर्यादित उपकारक व त्यामुळे भारतीय उद्योगधंद्याला विकासात्मक असा भारतीय रेल्वेचा विकास

५) या सर्व बदलांच्या अनुषगाने उत्पादन तंत्रात आवश्य व सुधारणा करण्यात अयशस्वी ठरले.

भारतातील औद्योगिक व्यवस्थापन प्रारंभीच्या नंतर युद्धे तर  काळात एकीकडे उत्पादन घटत होते आणि किंमत वाढत होत्या. मंजूर वर्गातील असंतोष पराठेला गेला होता. व उद्योगधंद्यात अपेक्षित भांडवल गुंतवणूक होत नव्हते. यावर तोडगा म्हणून मजुरा गाडीवर फिरताना औद्योगिक आघाडीवर विश्वास वाढविण्यासाठी १९४८ साली आपले औद्योगिकधोरण जाहीर केले. हे औद्योगिक धोरण सरकारच्या एकूण आर्थिक व राजकीय दोन आहे. राष्ट्रीय उत्पन्नात, राहणीमानात वाढ व्हावी. आर्थिक सामाजिक न्यायाच्या दृष्टीने वाटचाल करावी. एकंदरीत रोजगार वाढ व्हावी हे आर्थिक नीतीचे स्वरूप होते.

*औद्योगिक धोरणाचे स्वरूप त्रिविध होते :-

१) औद्योगिक धंदे सरकारी क्षेत्रात आहे. यांच्या मतेदारीसरकारकडेच राहावे.

२) सरकारने मुलभूत धान्याच्या पुढील विकासाची जबाबदारी घ्यावी. परंतू खाजगी क्षेत्रातील अशा धंद्याच्या ताब्यात राष्ट्रीयकरणाच्या प्रश्नाचा दहा वर्षानंतर विचार करावा.

३) राहिलेल्या उद्योगधंद्यात राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने जरूर असलेले नियंत्रण ठेऊन खाजगी घटना संपूर्ण वाव व स्वातंत्र्य द्यावे.

* नियोजनपूर्व भारत:-

१) सरकारी क्षेत्राची औद्योगिक भाग अपेक्षित होता. राष्ट्रीय एकूण उत्पनात सरकारी उद्योगधंदा हिस्सा १९४८-४९ फक्त २.८% होता.

२) कारखानदारी परकीय भांडवलाचा वर चष्मा होता. मळा अध्यक्ष उद्योगधंदे पेट्रोलियम कारखानदारी व इतर मिळवून जवळ जवळ २५५ कोटी रुपये परकीय भांडवल १९४८ साली भारतात गुंतले होते.

३) भारताच्या आर्थिक शक्तीचे केंद्रीयकरण प्रामुख्याने तीन प्रकार यांनी झाले काही व्यवस्थापनात अधिकार त्यांच्या धंद्यावर ताबा व्यवस्थापन अथीकरणाच्या वर्चस्वाखाली अनेक अनेक प्रकारचे उद्योगधंदे संचालन मंडळाचे सभासदत्व हे तीन प्रकारचे होते.

४) मुलभूत व उपभोग वस्तूंच्या उद्योगांचे प्रामुख्याने वाढ होते.

५) उद्योगधंद्याचे प्रामुख्याने मुंबई व पश्चिम बंगाल या प्रांतात केंद्रीकरण झाल्यामुळे प्रादेशिक समतोलाचा अभाव होता.

भारताच्या औद्योगिक विकासाला चालना व गती पंचवार्षिक योजनाच्या काळात मिळाली आणि स्वयंचलित व स्वावलंबी व आद्योगिक विकासाचा पाया घातला गेला. नियोजनात निश्चित केलेल्या दिशेने औद्योगिक विकासाचा पाया घातला गेला. नियोजनात निश्चित केलेल्या दिशेने औद्योगिक धोरणास अनुसरून उद्योगधंद्याच्या वाढीचे अग्रक्रम ठरवण्यात आले. पहिल्या पंचवार्षिक योजनेचा उद्देश प्रामुख्याने शेतीला प्राधान्य देण्याचा असल्यामुळे या योजनेचा औद्योगिक विकासाचे स्वरूप मर्यादित होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात मिळालेली आणि स्वयं चलित व स्वावलंबी औद्योगिक विकासाचा पाया घातला गेला. नियोजन निश्चित केलेल्या दिशेने औद्योगिक विकास करण्याकरिता औद्योगिक धोरण अनुसरून

उद्योगधंद्याच्या वाढीचे अग्रक्रम ठरवण्यात आले. पहिल्या पंचवार्षिक योजनेचा उद्देश प्रामुख्याने शेतीला प्राधान्य देण्याचा असल्यामुळे या योजनेत औद्योगिक विकासाचे स्वरूप मर्यादितच होते.

एकंदर औद्योगिक विकासाच्या भांडवल गुंतवणूकीपैकी पहिल्या पंचवार्षिक योजनेत सरकार क्षेत्राचा वाटा १९% होता. तो दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या पंचवार्षिक योजनेचा अनुक्रमाने पंच ५२%, ५९% व ५८% झाला. योजनांमुळे सरकारी क्षेत्रात विविधतेने उत्पादन करणारे औद्योगिक सुरु झाले. उदा. पोलाद, खनिजे, यंत्र, अवजारे, सुक्ष्म उपकरणे, औद्योगिक डबे, पदार्थ, कृत्रिम, ए, जहाजे, कागद, रासायनिक खाते, हॉटेल, टेलिफोनच्या तारा, विमाने, विजेच्या सहाय्याने चालणारी यंत्रे, विजेचे सामान, शैले, रसायने, खनिज तेल वगैरे तसेच उद्योगधंद्याच्या वाढीला सक्रीय मदत व उत्तेजन देण्याकरिता राष्ट्रीय खनिज विकास निगम देखील विकास निगम इत्यादी अनेक संस्था सरकारी स्थापना केले आहेत.

| पंचवार्षिक योजना | सरकारी क्षेत्रातील भांडवल गुंतवणूक (कोटी रुपये) | खाजगी क्षेत्रातील भांडवल गुंतवणूक (कोटी रुपये) | एकुण भांडवल गुंतवणूक (कोटी रुपये) | सरकारी क्षेत्रातील गुंतविलेल्या भांडवलाचे एकूण आद्योगिक क्षेत्रात गुंतविलेल्या भांडवलाचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| पहिली | ५५ | २३३ | २८८ | १९ |
| दुसरी | ९३८ | ८५० | १७८८ | ५२ |
| तिसरी | १५२० | १०५० | २५७० | ५९ |
| चौथी | ३०४८ | २२५० | ५२९८ | ५८ |
| एकूण | ५५३१ | ४३८३ | ९९४३ | १८८ |

अल्युमिनियम, मोटार गाड्या, विजेरी रोहीत्र, कापड गिरणी यंत्रे, यांत्रिक हत्यारे, साखर, तागाचे कापड, पंप, डिझेल इंजिन, पेट्रोलियम पदार्थ यांचे उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्याने त्यांचे उत्पादन क्षमता व उत्पादन करणाऱ्या उद्योगांनी त्याचे उत्पादन क्षमता व उत्पादन याबाबतीत आपले उद्दिष्टे तिसऱ्या योजना काळात गाठले परंतू पोलाद व खते यासारखे  काही प्रमुख उद्योग आपले उद्देश गाठण्यास बऱ्याच प्रमाणात असफल ठरल्या.

उदा. १८६८-६९मधील पोलाद उत्पादन केवळ ४७ लाख टन होते. ते योजनेच्या ६८ लाख घटनांच्या उद्दिष्टांपेक्षा केले तरी कमी होते. तरी १९६१-६६  व १९६६-६९  या काळात औद्योगिक अभियांत्रिकी खाणी व वीज निर्माण इत्यादी.

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासातील वैशिष्टय म्हणजे सहकारी उद्योगांच्या बाबतीत महाराष्ट्राने देशापुढे ठेवलेल्या आदर्श साखर कारखान्याप्रमाणेच कापसाचे इंजिन व प्रेसिन भात गिरण्या सडीच्या घेण्यात इ. मिळवून अनेक उद्योग संस्था आजही सहकारी क्षेत्रात चालू आहेत. भुईमुग हे महाराष्ट्रातील महत्त्वाच्या नगदी पिकांपैकी एक असल्याने आहेत. १९६९ मध्ये एकट्या औरंगाबाद विभागातच नन तेलगिरण्या जळगाव नंतर नाशिक व धुळे या भागात आहेत. मुंबई विभागातील एकूण गिरण्यांची संख्या १०४ असून मुंबई शहरातच ३८ गिरण्या आहेत. कापसाचे इंजिन व प्रेसिंग करणाऱ्या कारखान्याचे संख्या संबंध राज्यात १९६८ साली  झाले. ४८८ होते त्यापैकी पुष्कळच कारखाने २२४ नागपूर भागातच होते. औरंगाबाद नन कारखान्यापैकी 24 धुळे जिल्यात तर ५३ जळगाव जिल्ह्यात आहेत. पुणे विभागात असे ८८ कारखाने  आहेत.



राज्यातील एकूण सूतगिरण्या दीड लाख  हातामागांपैकी ७९ हजार हातमाग सहकारी क्षेत्रात आले आहेत. सहकारी सुत गिरण्यांची संख्या वाढत आहेत.

| उद्योग | उत्पादन भांडवल | उत्पादन मूल्य | कारखानदारी मुळे होणारी मूल्यवृद्धी |
|---|---|---|---|
| कापड उद्योग | २१५७९ | ४७५३८ | १४२४१ |
| अन्न उद्योग | ४८३१ | २३९३६ | ६२३८ |
| साधारण विद्युत अभियांत्रिकी उद्योग | १६५५५ | २१९०२ | ६२३८ |
| पेट्रोलियम उद्योग | ६३२६ | ६६०८ | १२३८ |
| वाहतूक साधनसामग्री | ७१०७ | १२४१११ | ३१८२३ |
| साखर कारखाने | ५६०२ | ८३५९ | १२९० |
| मूल्य औद्योगिक | २३८४५ | २५४९३ | १४८५३ |
| इतर उद्योग | ४७५२० | ५३८०३ | १४८५३ |
| एकूण उद्योग | १३५७७८ | २०४२४० | ५१८८८ |

| जिल्हा | उत्पादक भांडवल | उत्पादन | कारखानदारीमुळे होणारी मूल्यवर्धी |
|---|---|---|---|
| मुंबई | ६७.८४ | ७२.८२ | ७७.२२ |
| ठाणे | ७.२३ | ४.५९ | ४.४९ |
| अहमदनगर | ३.०४ | २.३८ | २.०५ |
| पुणे | ५.९७ | ४.०४ | ४.०२ |
| सोलापूर | १.६२ | २.३ | २.१८ |
| नागपूर | १.५६ | २.४ | २.२४ |
| इतर | १२.७४ | ११.४७ | ७.८ |

"Empowerment of Girl Students in Pursuit of Knowledge, Values and Self - reliance"

शिक्षण मंडळ, कराड संचालित

# महिला महाविद्यालय, कराड

## आर्ट्स, कॉमर्स, सायन्स, बी.कॉम (आय. टी.)

| Traditional Courses | Value Added Courses (Collaborative) | Employment Oriented Courses | Our Services to Community | Express Your Interest |
|---|---|---|---|---|
| **B. A.** (English, Marathi, Hindi, Economics, Geography, Psychology) | Digital Film Making (Weekly Training) | आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र GST Assistant | 'AKRUTI' Kendra (Mentorship Programme from BARC Scientist & Faculty of Mahila Mahavidyalaya, Karad) | Bachelor of Science in AI (Artificial Intelligence) |
| **B.Com.** | Food Industry Entrepreneurship Development Programme | Certificate Course in Designer Saree Blouse Making (Affiliated to Shivaji University, Kolhapur) | Soil Organic Carbon Detection for Farmers (Bhabha Atomic Research Center Technology) | M.Sc. (Microbiology) |
| **B.Com. IT** | Vlogging (Lifestyle, Travel, Food Workshop) | Certificate Course in Beauty Care (Affiliated to Shivaji University, Kolhapur) | Instant Analysis of Soil Fertility (Bhabha Atomic Research Center Technology) | DMLT (2 Yrs Course, equivalent to XII) |
| **B. Sc.** (Microbiology & Computer Science) | Social Media Marketing for Business | Certificate Course in Balwadi Teachers Training (Affiliated to Shivaji University, Kolhapur) | लोकमान्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र (Foundation Course) | **Extension Activities** |
| **M. A. / M. Sc.** (Geography) | LinkedIn Optimization Training Course | Certificate Course in Milk Microbiology (Affiliated to Shivaji University, Kolhapur) | Water Testing and Water Potability Test | NSS National Service Scheme |
| **Geography Research Lab & Ph. D. Centre** | Video Editing Course | व्यक्तिमत्त्व विकास अभ्यासक्रम (Affiliated to Shivaji University, Kolhapur) | Food Testing for Pathogens | Lokmanya Green Club |
|  | E - Commerce & Government Tendering | Travel and Tourism (Affiliated to Shivaji University, Kolhapur) | Pathogen Identification and Bacterial Identification (16 'S' Ribosomal typing)MALDI-TOF | आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र |
| | Advanced Certificate Programme in Event Management | Fashion Designing | Technology Transfer Office (TTO) | करिअर कट्टा |
| | | E-Banking, Mehndi, Jewellery Making etc. | Air Monitoring / Air Sampling Facility for Industrial and Hospital Accreditation. | Infectious Diseases Awareness Centre |
| | | रोपवाटीका व उद्यान कौशल्य तंत्र | | Red Ribbon Club Activity |


• Contact us : E-mail: karadmahila@gmail.com • Website: https://www.mahilamahavidyalaya.com • Contact No: 02164-220849

Mobile No: Shri. Nitin Deshapande 9921992212 | Dr.Akhilesh Shinde 9765719764 | Dr. Pritam Misale 9604270180